इतिहासाच्या समृद्ध परंपरेमुळेच विकसित भारताची पायाभरणी – डॉ. राजाराम राठोड

आबासाहेब मराठे महाविद्यालयात इतिहासाच्या पाऊलखुणा भित्तीपत्रिकेचे सादरीकरण

राजापूर (प्रतिनिधी):

भारत देशाला इतिहासाची समृद्ध परंपरा लाभली असून तोच वारसा पुढच्या पिढीला ज्ञात करून दिल्यास विकसित भारताची पायाभरणी शक्य आहे. असे प्रतिपादन प्राचार्य राजाराम राठोड यांनी केले ते रयत शिक्षण संस्थेच्या, आबासाहेब मराठे महाविद्यालय राजापूर (विखारी-गोठणे) येथे इतिहास विभाग आयोजित विकसित भारत : इतिहासाची आवृत्ती या भित्तीपत्रक सादरीकरणाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना डॉ. राठोड यांनी समृद्ध इतिहासाची परंपरा सदैव तेवत ठेवल्यास पुढच्या पिढीला इतिहास ओझे वाटणार नाही व विकसित भारत संकल्पनेत पुढची पिढी नक्कीच आपला हातभार लागेल असा आशावाद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.संजय मेस्त्री यांनी इतिहास विभागाच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून इतिहासाचे जतन व संवर्धन पुढच्या पिढीसाठी दीपस्तंभ ठरेल असे कार्य आपल्या हातून घडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली .

प्रास्ताविकातून इतिहास विभागप्रमुख प्रा. अण्णासाहेब सदगर यांनी उपक्रमाचा उद्देश विशद केला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.अतुल भावे, डॉ.हेमंत अकोलकर, डॉ.कुलभूषण ससाणे, डॉ.नबिला सोलकर, प्रा. वैष्णवी कानडे, डॉ. प्रतिभा रुपणार उपस्थित होते.

आबासाहेब मराठे महाविद्यालयात 'विकसित भारत इतिहासाची आवृत्ती' भित्तीपत्रक उपक्रम

आबासाहेब मराठे महाविद्यालयात भित्तीपत्रक उपक्रमाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ.राजाराम राठोड व मान्यवरांसह विद्यार्थी.

राजापूर: भारत देशाला इतिहासाची समृध्द परंपरा लाभली असून तोच वारसा पुढच्या पिढीला ज्ञात करून दिल्यास विकसित भारताची पायाभरणी शक्य आहे असे प्रतिपादन प्राचार्य राजाराम राठोड यांनी केले. ते रयत शिक्षण संस्थेच्या आबासाहेब मराठे महाविद्यालय येथे इतिहास विभाग आयोजित 'विकसित भारत इतिहासाची आवृत्ती' या भित्तीपत्रक सादरीकरणाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना डॉ.राठोड यांनी समृध्द इतिहासाची परंपरा सदैव तेवत ठेवल्यास पुढच्या पिढीला इतिहासाचे ओझे वाटणार नाही व विकसित भारत संकल्पनेत पुढची पिढी नक्कीच आपला हातभार लागेल असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा.डॉ.संजय मेस्त्री यांनी इतिहास विभागाच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून इतिहासाचे जतन व संवर्धन पुढच्या पिढीसाठी दीपस्तंभ ठरेल असे कार्य आपल्या हातून घडावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या स्वागत व प्रास्ताविकातून इतिहास विभागप्रमुख प्रा.आण्णासाहेब सदगर यांनी उपक्रमाचा उद्देश विषद केला व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.अतुल भावे, डॉ.हेमंत अकोलकर, डॉ.कुलभूषण ससाणे, डॉ.नबिला सोलकर, प्रा.वैष्णवी कानडे, डॉ.प्रतिभा रूपणार आदी उपस्थित होते. प्रा.विजय देवकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

आजचा पदार्थ

मालपुवा

साहित्य :गव्हाचे पीठ किंवा मैदा: १ कप, **दूध:** १ कप (कोमट), **साखर:** १ कप (चाशनीसाठी आणि पिठात टाकण्यासाठी), **बडीशेप पावडर / अख्या बडीशेप:** १ छोटा चमचा (छान सुवासिक चवीसाठी), **वेलची पावडर:** १/२ छोटा चमचा, **ड्रायफ्रूट्सचे काप:** बदाम, पिस्ता,